# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक क्र. मशिमाक/ २ /२०२१–२०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षामध्ये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणूका करणेबाबत विविध संघटना यांचेकडून निवेदने संचालनालयास प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार अकृषि विद्यापीठाशी संलंग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अनुज्ञेय केलेल्या कार्यभारानुसार तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या संदर्भात विहित प्रक्रिया पार पाडण्याची कार्यवाही शैक्षणिक वर्ष २०२१–२२ सुरू होण्यापूर्वी करण्यात यावी, असे शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. तातप–१५२१/प्र.क्र.०७४/मवि.१/७३४७ दिनांक २७/०६/२०२१, अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. सोबत पत्राची प्रत जोडली असून सदरच्या आदेशानुसार व विद्यापीठाने निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार महाविद्यालय स्तरावर पुढील कार्यवाही करावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ५ जुलै, २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
कुलसचिव (प्रभारी)
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधीत संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :–

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.
२. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई – ४०० ००१.
३. मा. सह संचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल – ४१० २०६.
४. मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
५. मा. प्र. कुलगुरूंचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव (प्रभारी), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
७. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).